" स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" – कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे

# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय

## व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम

मोखाडा, ता. मोखाडा, जि. पालघर - ४०१ ६०४

फोन : कॉलेज : (०२५२९) २५६६२८,

प्राचार्य निवास : (०२५२९) २५६७०६

* * *

# कनिष्ठ महाविद्यालय

## (उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम)


कोड नं. जे–१८/०२/९०१

# माहिती-पत्रक

...रक्तदान श्रेष्ठदान...

किंमत : ५०/–रुपये

# * आमची प्रेरणा *



## डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, डी.लीट.

### * संस्थापक *

### रयत शिक्षण संस्था, सातारा

# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्था सातारा यांच्या विविध शैक्षणिक शाखांपैकी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा हे महाविद्यालय जून १९८४ मध्ये सुरु झाले. या महाविद्यालयात पदवी पर्यंतच्या शिक्षणासाठी कला, विज्ञान व वाणिज्य या तीन शाखा आहे. इ. ११ वी व १२ वी. साठी केंद्रशासन पुरस्कृत + २ स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रमांची सोय आहे. मोखाडा तालुका हा पालघर जिल्ह्यातील अतिदुर्गम व संपूर्ण आदिवासी तालुका असल्याने या आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन शिक्षणाची गरज भागविणे व आदिवासी भागातील मागास जाती, जमातीतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात सामील करणे. त्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे हा महाविद्यालय स्थापन करण्याचा उद्देश आहे.

प्राचार्य :- डॉ. जाधव जे. जी.

## * कार्यालयीन वेळ *

सकाळी - १०.०० ते दुपारी - ५.३०

(कामकाजाच्या सर्व दिवशी)

## * महाविद्यालयीन वेळ *

सकाळी - ११.२० ते दुपारी - ५.००

(व्यवसाय अभ्यासक्रम विभाग)

# केंद्रशासन पुरस्कृत +२ स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम योजना विषयी माहिती

## पार्श्वभूमी :-

उच्च माध्यमिक परीक्षा (इ. १२ वी.) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ५०% विद्यार्थ्यांनांच विद्यापीठ किंवा तिसऱ्या उच्च स्तरावरील शिक्षणास प्रवेश मिळू शकतो, असा शिक्षण आयोगाचे अध्यक्ष प्रा. डी. एस. कोठारी यांचा निष्कर्ष आहे. ज्या विद्यार्थ्यांना अधिक गुण व पालकांच्या आर्थिक कुवती अभावी उच्च शिक्षण घेण्याची संधी नाही. अशा विद्यार्थ्यांसाठी जीवनोपयोगी शिक्षण व व्यवसाय शिक्षणातील काही कौशल्ये आत्मसात करून स्वत:च्या हाताने स्वंयरोजगार सुरू करण्यासाठी डॉ. कोठारी यांनी +२ स्तरावर (इ. ११ वी व इ. १२ वी.) व्यवसाय शिक्षणाचा पुरस्कार केला व शै. वर्ष १९७८–७९ पासून महाराष्ट्र शासनाने ३३% व्याप्ती असलेले द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु केले व पुढे सन १९८८–८९ पासून त्यात आणखी भर म्हणून भारत सरकारने केंद्रशासन पुरस्कृत रोजगार व स्वयंरोजगारास जास्त उपयुक्त व ७०% व्यवसाय व्याप्तीचे व्यवसाय अभ्यासक्रम सुरू केले. हे अभ्यासक्रम सुरू करण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे संघटीत व प्रामुख्याने असंघटीत क्षेत्रातील उद्योगक्षेत्रासाठी उदा. अभियांत्रिकी शास्त्र, उद्योग व वाणिज्य, शेती, मत्स्यव्यवसाय, आरोग्य व वैद्यकिय, गृहविज्ञान इ. सहा मुख्य व्यवसाय शाखामधील किमान कौशल्ये आत्मसात करणारे विद्यार्थी तयार व्हावेत. की जेणेकरून या उद्योगक्षेत्रास कमी मानधनावर मनुष्यबळ उपलब्ध होईल व दुसऱ्या बाजुस ज्यांची उच्चशिक्षणाची संधी गेली. त्यांच्यासाठी हे अभ्यासक्रम उपयुक्त ठरतील.

यासाठी सुरुवातीस वरील सहा व्यवसाय शाखातील एकूण ३६ विषयांच्या व्यवसाय अभ्यासक्रमाची सुरुवात केली.

मोखाडा महाविद्यालयाने शै. वर्ष १९९१–९२ पासून अभियांत्रिकी शाखेतील इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी व वाणिज्य गटातील लॉजिस्टिक्स ॲण्ड सप्लाय चेन मॅनेजमेंट हे दोन व्यवसाय अभ्यासक्रम सुरु केलेत. या अभ्यासक्रमात शिकविले जाणारे विषय व अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे.

# १) इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी

| इ. ११ वी विषय | इ. १२ वी विषय |
|---|---|
| १) प्रथम भाषा - इंगजी<br>२) द्रितीय भाषा - मराठी<br>३) सामान्य पायाभूत अभ्यासक्रम<br>४) इलेक्ट्रिकल वायरिंग - पेपर -१<br>५) डोमेस्टीक ॲप्लायनसेस पेपर - २<br>६) इलेक्ट्रीकल मशिनस् पेपर - ३<br>७) पर्यावरण शिक्षण<br>८) शा. शिक्षण | १) प्रथम भाषा - इंगजी<br>२) द्रितीय भाषा - मराठी<br>३) सामान्य पायाभूत अभ्यासक्रम<br>४) इलेक्ट्रिकल वायरिंग - पेपर -१<br>५) डोमेस्टीक ॲप्लायनसेस पेपर - २<br>६) इलेक्ट्रीकल मशिन्स पेपर - ३<br>७) पर्यावरण शिक्षण<br>८) शारिरिक शिक्षण |

## या अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये :-

### अ) रोजगार विषयक संधी :-

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर घरगुती विद्युत उपकरणांची दुरुस्ती, तपासणी, उभारणी, रिवाईडींग इ. मध्ये रोजगार उपलब्ध होतो.

### ब) स्वयंरोजगार विषयक संधी :-

विद्युत उपकरणे विक्रीची एजन्सी, दुरुस्ती केंद्र, विविध छोटी उपकरणे निर्मिती उद्योग इ.

# २) लॉजेस्टिक व सप्लाय चेन मॅनेजमेंट

| इ. ११ वी विषय | इ. १२ वी विषय |
|---|---|
| १) प्रथम भाषा - इंगजी<br>२) द्रितीय भाषा - मराठी<br>३) सामान्य पायाभूत अभ्यासक्रम<br>४) पर्चेस मॅनेजमेंट - पेपर - १<br>५) लॉजेस्टिक ॲण्ड वेअर हाऊसिंग- पेपर-२<br>६) बँकींग ॲण्ड अकाऊंटिंग - पेपर - ३<br>७) पर्यावरण शिक्षण<br>८) शा. शिक्षण | १) प्रथम भाषा - इंगजी<br>२) द्रितीय भाषा - मराठी<br>३) सामान्य पायाभूत अभ्यासक्रम<br>४) रिटेल मॅनेजमेंट - पेपर -१<br>५) सिक्युरिटी ॲण्ड सेफ्टी इक्युपमेंट पेपर-२<br>६) सप्लाय चेन मॅनेजमेंट - पेपर -३<br>७) पर्यावरण शिक्षण<br>८) शा. शिक्षण |

## या अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये :-

अ) **रोजगार विषयक संधी :-**

खाजगी व सार्वजनिक उद्योग क्षेत्रात पर्चेस व स्टोअर विभागात पर्चेस/स्टोअर्स असिस्टंट व क्लार्क या पदासाठी संधी.

ब) **स्वयंरोजगार विषयक संधी :-**

घाऊक व किरकोळ प्रमाणातील विविध वस्तूचे विक्री व्यवसाय, खरेदी व विक्री प्रतिनिधी, गुदाम रक्षक इ.

वरील दोन्ही अभ्यासक्रमांपैकी कोणत्याही एका अभ्यासक्रमाची निवड करता येते त्यासाठी

१) प्रवेश पात्रता :- इ. १० वी पास.

२) प्रवेश क्षमता :- फक्त २५ विद्यार्थी प्रती अभ्यासक्रम

## अभ्यासक्रमाची रुपरेखा :-

केंद्रीय स्तरावर मनुष्यबळ संशोधन व विकास मंत्रालयाकडून ही योजना सुरु झालेली असून एन.सी.ई.आर.टी. मार्फत सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ एज्युकेशन ही योजना राबविण्याच्या शिफारस करते.

राज्य स्तरावर, उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाकडून संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय हे प्रत्यक्ष ही योजना राबविते. एन.सी.ई.आर.टी. व राज्य सरकार या दोहोमध्ये समन्वय साधण्यासाठी राज्य व्यवसाय शिक्षण परिषद सुरु केलेली आहे. ही परिषद योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनास व संचालनालयास शिफारसी सूचना देते. जिल्हा पातळीवर जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी हे ही योजना राबवितात. या व्यवसाय अभ्यासक्रमासंबंधी संक्षिप्त माहिती खालील प्रमाणे :-

१) या अभ्यासक्रमात व्यवसाय विषयाची व्याप्ती ७०% असल्यामुळे प्रात्यक्षिकासाठी भरपूर सराव मिळतो.

२) इ. १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ सुधारित नियम २००१ नुसार शिकाऊ उमेदवारी करण्याची संधी व प्रशिक्षण कालावधीत दरमहा रु. १०९०/- विद्यावेतन देय आहे.

३) या प्रशिक्षणात चार भिंती व खडू-फळा यांचे बंधन नसल्यामुळे, कार्यशाळेतील प्रात्यक्षिके व थेअरी झाल्यानंतर स्थानिक आस्थापन, उद्योगधंदे, दुकाने इ. मध्ये प्रत्यक्ष कामकाजाच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना नेऊन प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण दिले जाते.

४) ऑन दि जॉब ट्रेनिंगमुळे मुलांचा प्रत्यक्ष उद्योग व व्यवहार यांचा संबंध येतो. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो व ही मुले आपोआपच व्यवसाय सुरु करण्यास प्रोत्साहीत होतात.

५) इ. १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून प्रमाणपत्र मिळते तसेच व्यवसाय अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये सांगणारे स्वतंत्र प्रमाणपत्र मिळते. त्याचा फायदा स्वयंरोजगारासाठी कर्ज घेतांना होतो.

## ६) शासकीय योजना :-

अ) हे अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या युवकांची सेवायोजन कार्यालयात झेड-कॅटेगरीत नांव नोंदणी सुरु झालेली आहे.

ब) उद्योग व ऊर्जा विभागाकडून निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्रमांक इपीपी/१०९२/६३६४/उद्यो.-१८ दि. १९-८-९२ नुसार सुशिक्षित बेरोजगारांसाठी बीज भांडवल सहाय्य योजना या योजनेअंतर्गत इ. १२ वी उत्तीर्ण उमेदवारांना सुलभ अर्थसहाय्य मिळते.

क) वित्तीय कर्ज पुरवठ्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र राज्य उद्योजकता विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ, खादी व ग्रामोद्योग, वसंतराव नाईक विकास महामंडळ, आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ इ. संस्था या युवकांना मदत करतात.

ड) ई.बी.सी., पी.टी.सी., स्कॉलरशीप इ. सवलती मिळतात.

इ) राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना.

७) प्रशिक्षणासाठी अद्यावत कार्यशाळा, संगणक कक्ष, ग्रंथालय, अभ्यासिका इ. ची सोय उपलब्ध आहे. प्रशिक्षित व अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन मिळते.

९) शासन निर्णय क्र. यु.एस.जी. १४९३/(२४२८) वि. शि.-४ मंत्रालय, मुंबई-३२. दि. २२/६/९५ व शासन निर्णय क्र. १९९४ (३००३) व्यशि.-१ दि. २२/६/९४ नुसार मागासवर्गीयांसाठी जागांचे आरक्षण खालील प्रमाणे असेल.

| | प्रवर्ग | शेकडा आरक्षण |
|---|---|---|
| १) | अनुसुचित जाती | १३% |
| २) | अनुसुचित जमाती<br>(शासन निर्णय ११९४ (३००३) नुसार आदिवासी विभागात २२%) | ७% |
| ३) | विमुक्त जमाती | ३% |
| ४) | भटक्या जमाती (अ) | २.५% |
| ५) | भटक्या जमाती (ब) | ३.५% |
| ६) | भटक्या जमाती (क) | २% |
| ७) | इतर मागास वर्ग | १९% |
| ८) | विशेष मागास प्रवर्ग | २% |
| | एकूण | ५२% |
| ९) | या व्यतिरिक्त | ३% |

**खालील संवर्गासाठी**

अ) बदलून आलेले केंद्रीय/राज्य शासकीय कर्मचारी/अधिकारी यांचे पाल्य

ब) संरक्षण दलातील आजी/माजी सैनिकांचे पाल्य

क) राज्य/राष्ट्रीय पातळीवर क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रमांस विशेष नैपुण्य मिळविलेले विद्यार्थी

ड) शारीरिक दृष्ट्या अपंग/विकलांग विद्यार्थी

इ) विधवा/परित्यक्ता विद्यार्थीनी

ई) स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य/नातवंडे

# इ. ११ वी व्यवसाय अभ्यासक्रम विभाग फी तपशिल

| अ.नं. | फी चा प्रकार | | रुपये |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश फी | २० X १ | २० |
| २. | शिक्षण फी शुल्क दरमहा | २० X १२ | २४० |
| ३. | टर्म फी रु. | २० X १ | २० |
| ४. | प्रयोगशाळा फी | ४० X १ | ४० |
| ५. | संस्था विकास निधी | ५० X १२ | ६०० |
| | एकूण | | ९२० |

# इ. १२ वी व्यवसाय अभ्यासक्रम विभाग फी तपशिल

| अ.नं. | फी चा प्रकार | | रुपये |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश फी | ० | ० |
| २. | शिक्षण फी शुल्क दरमहा | २५ X १२ | ३०० |
| ३. | टर्म फी रु. | २० X १ | २५ |
| ४. | प्रयोगशाळा फी | ५० X १ | ५० |
| ५. | संस्था विकास निधी | ५० X १२ | ६०० |
| | एकूण | | ९७५ |

शुल्क स्विकारणे, परत करणे, तसेच शासकीय शिष्यवृत्ती आर्थिकदृष्ट्या मागासलेले विद्यार्थ्यांबाबतीत शिक्षण शुल्क सवलत इ. सर्व बाबी अनुदान संहितेमध्ये दर्शविल्याप्रमाणे व शासनाच्या वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या नियमानुसार असेल.

प्राचार्य

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

मोखाडा

रयत शिक्षण संस्थेचे

# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

मोखाडा, जि. पालघर

## व्यवसाय अभ्यासक्रम विभाग शिक्षक

**मा. प्राचार्य :– डॉ. जे.जी. जाधव** (एम.ए., एम.फिल., पीएचडी)

## * इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी *

१) पूर्ण वेळ शिक्षक : श्री. कुंभार जे. ए. (डि. ई. ई.)

२) पूर्ण वेळ निदेशक : श्री. खोसे पी. एस. (डि. ई. ई.)

## * लॉजिस्टिक्स अॅण्ड सप्लाय चेन मॅनेजमेंट *

१) पूर्ण वेळ शिक्षक : श्री. माळोदे बी. एन. (एम.कॉम.,डी.सी.एम.,डी.एम.एम.)

२) पूर्ण वेळ शिक्षक : श्री. महाले हरिदास महादू (बी.कॉम.,बी.एड.)

## * तासिका तत्त्वावरील शिक्षक *

**भाषा विषय :–**

१) इंग्रजी : श्री. देवरे एस. डी. (एम.ए., बी.एड.)

२) मराठी : श्री. तुळे व्ही. एस. (एम.ए., बी.एड.)

**ग्रंथपाल :–** १) प्रा. धावणे पी. एम. (बी.एस्सी., एम्.लिब अॅन्ड आय.एस्सी,एम.फिल)

## कार्यालयीन सेवक

१) मुख्य लिपीक : श्री. माने डी. के.

२) कनिष्ठ लिपीक : श्री. गायकवाड एस. एस.

३) शिपाई : श्री. जाधव गोविंद आर.

श्री. भाऊराव पाटील की सेवा ही उनका सच्चा किर्तीस्तंभ है ।
फिर भी छात्रोंने जो प्रगती की है वह उनके लिए तो स्तुत्य है ।
श्री. भाऊराव दीर्घकाल तक सेवा करते रहें ।

महात्मा गांधी

कर्मवीर भाऊराव यांच्या महान कार्याचा विस्तार पाहून मला स्फूर्ती उत्पन्न झाली एवढेच नव्हे तर शिक्षणतज्ञ म्हणून असणारी माझी ऐटही थोडीशी कमी झाली. कारण या संस्थेपासून मला पुष्कळ शिकण्यासारखे आहे. या संस्थेच्या यशाचे मर्म मला वाटते. कर्मवीर यांच्या व्यक्तिमत्वाला आहे. संस्थेचे नाव सार्थ आहे. कारण ही संस्था, लोकांची, लोकांसाठी व लोकांनी चालविलेली आहे. जनतेच्या गरजेतून निर्माण झालेली ही संस्था आहे.

अमेरिकन शिक्षण तज्ञ - प्रा. कोप

"Advocacy of unity and equality in society was the soul of Bhaurao's work. In fact his work itself was glittering manifestation of oneness and fraternity. Compassion was the basic feature of his nature. He was the glorious figure in the great Maharashtrian Tradition of last hundred years".

**Dr. Dhananjayrao Gadgil**

Plant A Tree = Plant A Life
बचत पाण्याची, गरज काळाची

मुलगा-मुलगी भेद नको,
मुलगी झाली खेद नको.